ISSN 2278-8808 IMPACT FACTOR: 1.38
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# कृती संशोधनाची आवर्त मांडणी

डॉ. विलास य. रणसुरे, सहयोगी प्राध्यापक
अध्यापक महाविद्यालय, अरण्येश्वर, पुणे : ०९

कृती संशोधन हा एक उपयोजित संशोधनाचा प्रकार मानला जातो. कृती संशोधन हे शिक्षणाशी संबंधित असून शिक्षणक्षेत्रात या संशोधनास अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. शाळेचे दैनंदिन कार्य पार पाडत असताना शिक्षक, मुख्याध्यापक व प्रशासक यांना आलेल्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी या संशोधनाचा आधार घेतला व त्यातून कृती संशोधनाचा उदय झाला. आपल्या दैनंदिन कार्यातील शैक्षणिक समस्या शिक्षकांनी स्वतः कृतीयुक्त उपाय योजून सोडविणे म्हणजे कृतीसंशोधन होय. कृतीसंशोधनाची सुरुवात इ.स. १९३० मध्ये प्रथम अमेरिकेतील मिनेसोटा या विद्यापीठात झाली. या विद्यापीठात कार्यरत असलेल्या शिक्षकांकडून स्वतःच्या दैनंदिन अध्यापन प्रक्रियेत येत असलेल्या समस्या संशोधन पध्दतीने सोडविण्याचे संस्था पातळीवरील प्रयत्न स्वतः शिक्षकांकडून प्रथम या विद्यापीठात केले गेले. म्हणून या विद्यापीठाला कृतिसंशोधनाचे पुरस्कर्ते म्हणून ओळखले जाते. इ.स. १९४४ साली कर्ट लेविन यांनी या प्रकारच्या संशोधनाला कृतीसंशोधन असे नाव दिले. कर्ट लेविन यांनी कृतीसंशोधन ही प्रक्रिया स्पष्ट करताना आवर्त मांडणी विचारात घेतली होती. त्यांनी प्रत्येक आवर्तनात चार टप्पे सांगितले असून पहिला टप्पा हा नियोजन, दुसरा कृती, तिसरा निरीक्षण व चौथा टप्पा हा प्रत्याभरण सांगितला आहे. या प्रक्रियेत समस्येचे निराकरण होईपर्यंत कृती अपेक्षित असल्याने पुन्हा पुन्हा सतत या चार टप्प्यांचा अवलंब करावा लागतो. निष्कर्षाची कार्यवाही केली गेली तरच ते कृती संशोधन ठरते. समस्यांचे निराकरण होईपर्यंत प्रयत्न करणे कृती संशोधनात अपेक्षित असते. पहिल्या आवर्तनात समस्येचे निराकरण झाल्यास दुसऱ्या आवर्तनाची गरज नसते. परंतु पहिल्या आवर्तन प्रक्रियेत कृती जर पुरेशी सफल झाली नसेल तर दुसऱ्या आवर्तन प्रक्रियेला सुरुवात करावी लागते. मात्र येथे दुसऱ्या आवर्तन प्रक्रियेतील कृती या पहिल्या आवर्तन प्रक्रियेतील कृतीपेक्षा भिन्न असतात.

कर्ट लेविन यांनी मांडलेल्या कृतीसंशोधनाच्या या संकल्पनेत कोलंबिया विद्यापीठातील अध्यापक महाविद्यालयाचे अधिष्ठाता स्टीफन कोरे यांनी सुधारणा घडवून आणली. त्यात त्यांनी स्थळ, काळ व परिस्थितीनुसार होणारे बदल यांना महत्त्व दिले. स्टीफन कोरे यांनी हा बदल घडवून आणल्यामुळे त्यांना कृती संशोधनाचे जनक म्हणून संबोधले जाते. त्यांनी कृती संशोधनाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

"आपले निर्णय व उपक्रम याबाबत मार्गदर्शन मिळावे, त्यात सुधारणा व्हाव्यात व त्यांचे योग्य तऱ्हेने मूल्यमापन व्हावे म्हणून व्यावसायिकानी आपल्या समस्यांचा अभ्यास वैज्ञानिक पध्दतीने स्वतःच करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे कृती संशोधन होय."

**कृती संशोधनाची आवर्त मांडणी** :– आपल्या दैनंदिन अध्यापन कार्यामध्ये शिक्षकांना नेहमी वेगवेगळया स्वरुपाच्या समस्या येत असतात. त्या सोडविण्याठी शिक्षकाला नेहमी कृतिसंशोधनाचा आधार घ्यावा लागतो. कृतीसंशोधनामध्ये नेहमी समस्येचे निराकरण होईपर्यंत कृती करत राहणे अपेक्षित असते. त्यामुळे त्याला नियोजन, कृती, निरीक्षण आणि प्रत्याभरण या चार टप्प्यांचा वापर सतत करावा लागतो. या चार टप्प्यांच्या संशोधनातील सततच्या वापरालाच कृतीसंशोधनाची आवर्त मांडणी असे म्हणतात. ही आवर्त मांडणी कशी असते ते पुढील उदाहरणाद्वारे पाहू. उदा. ५० विद्यार्थी संख्या असलेल्या एका वर्गात शिक्षक पुढील समस्येवर कृती संशोधन करु इच्छितात.

**संशोधन समस्या :– 'इ. ८ वी तील विद्यार्थ्यांच्या मराठी शुध्दलेखनातील चुकांचा शोध व उपाययोजना. '**

**पहिला टप्पा – नियोजन**

या टप्प्यात वरील समस्येच्या अभ्यासासाठी प्रथम पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागेल.

१) विद्यार्थी मराठी शुध्दलेखनात कोठे, का व कसे चुकतात ते शोधणे.

२) एकूण विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थी चुकतात त्यांचा शोध घेणे.

३) चुका शोधून काढण्यासाठी मूल्यमापन साधने बनविणे.

४) शाळेची वेळ व संशोधन उपक्रम राबविण्यासाठी आवश्यक असणारा वेळ यांचे योग्य नियोजन करणे.

**दुसरा टप्पा – कृतीः** या टप्प्यात प्रत्यक्ष कृतीवर भर असतो. नियोजनात जे उपक्रम निश्चित केलेले असतात ते प्रत्यक्ष राबविले जातात. म्हणजेच प्रत्यक्ष कृतीत आणले जातात. वरील समस्येच्या संदर्भात पुढील काही उपक्रम राबविता येतील.

१) एखादया परिच्छेदाचे विद्यार्थ्यांना लेखन करायला लावणे.

२) जोडशब्दांचे तक्ते दाखवून विद्यार्थ्यांना त्याप्रमाणे लेखन करायला लावणे.

३) काही शब्दांच्या पटटया दाखवून त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना लेखन करायला लावणे.

४) **तिसरा टप्पा – निरीक्षणः** दुसऱ्या टप्प्यातील प्रत्यक्ष कृती घेतल्यानंतर मूल्यमापनासाठी जे साधन तयार केलेले असते त्याचा वापर करुन निष्कर्ष काढले जातात. वरील उदाहरणावरुन शिक्षकांच्या असे लक्षात आले की, ५० विद्यार्थ्यांपैकी २० विद्यार्थ्यांच्या ऱ्हस्व–दीर्घ या संकल्पनेत चुका होतात.

५) **चौथा टप्पा – प्रत्याभरणः** आवर्तन प्रक्रियेतील हा शेवटचा टप्पा. या टप्प्यात निश्चित असा निकाल मांडला जातो. वरील अभ्यासात शिक्षकांच्या असे लक्षात आले की, २० विद्यार्थ्यांच्या लेखनात


हस्व–दीर्घ या संकल्पनेत चुका होतात. निकाल हा अपेक्षित नियोजनानुसार नसल्यामुळे वरील संशोधनात शिक्षकाला पुनर्नियोजन करुन दुसऱ्या आवर्तनाकडे वळावे लागते. या आवर्तनात शिक्षक चुका झालेल्या केवळ २० विद्यार्थ्यांच्या हस्व–दीर्घ या संकल्पनेतील चुका कमी करुन पूर्णपणे घालविण्याचा प्रयत्न करतात व उपक्रम राबवून प्रत्याभरण घेतात. या दुसऱ्या आवर्तनात जर अपेक्षित निकाल नाही मिळाला तर शिक्षकाला तिसऱ्या आवर्तनाकडे वळावे लागते. त्यातून पुनर्नियोजन, पुनःकृती, पुनर्निरीक्षण, पुनःप्रत्याभरण अशा चार टप्प्यांच्या मदतीने शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक ती सुधारणा घडवून आणतात आणि असणारी समस्या यशस्वीपणे सोडवितात. शिक्षकांच्या या संशोधन कृतीलाच **'कृती संशोधनाची आवर्त मांडणी'** असे म्हणतात.

वरील उदाहरण आकृतीद्वारे पुढीलप्रमाणे मांडता येईल

२० विद्यार्थ्यांच्या मराठी शुध्द लेखनात हस्व–दीर्घ या संकल्पनेत चुका होतात म्हणजेच पुनर्नियोजन आवश्यक



या वरील आवर्तनात शिक्षकाला जर अपेक्षित निकाल मिळाला नाही तर त्याला दुसरे आवर्तन मांडावे लागते. इयत्ता ८ वी तील विद्यार्थ्यांच्या मराठी शुध्द लेखनात होणाऱ्या चुका पूर्णपणे दूर करण्यात आलेल्या आहेत.




कृती संशोधनात संपूर्ण यश प्राप्त करावयाचे असेल तर पुढील गोष्टी शिक्षकाला विचारात घ्याव्या लागतात.

**संपूर्ण यश**

१. समस्येविषयी संवेदनशीलता असायला हवी.
२. समस्या निरसनाची गरज ओळखता येणे आवश्यक आहे.
३. विद्यार्थ्यांविषयी तळमळ असायला हवी.
४. गतिमान लवचिक नियोजन करायला हवे.
५. संशोधनाची मध्यवर्ती कल्पना माहीत असावी.
६. इतरांना सहकार्य देवून त्यांचे सहकार्य मिळवता आले पाहिजे.
७. सुधारणात्मक बदलास अनुकूल पोषक कृती करायला हव्यात.
८. प्रत्येक कृतीची योजना, उपयुक्तता, लाभदायकता यांचे मूल्यमापन करता आले पाहिजे.
९. पूर्ण यश मिळेपर्यंत कृती करत राहणे व त्यासाठी जिद्द बाळगायला हवी.
१०. गुणात्मक दर्जेदार शिक्षणाचे ध्येय समोर ठेवले पाहिजे.

संदर्भ : १) कृती संशोधन – डॉ केशर रामचंद्र जाधव शुभाय प्रकाशन, दादर, मुंबई : १४.
२) शैक्षणिक कृतीसंशोधन – डॉ के. यू. घोरमोडे, डॉ. कला घोरमोडे विद्या प्रकाशन, नागपूर
३) शैक्षणिक संशोधन पध्दती – डॉ. वि. रा. भिंताडे, नित्य नूतन प्रकाशन, पुणे ३०